**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील ६ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचे पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त..**

---

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील **कन्नड** तालुक्यातील ६ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज जसे **अंजना नदी पात्रातील रेती घाट जसे टाकली बु., जवखेड खु./जगखेड बु., सारोळा,** शिवणा **नदी पात्रातील रेती घाट जसे बोरसार बु./बोरसार खु. आणि शेवटा खु., पुर्णा नदी पात्रातील रेती घाट जसे दिगावखेडी** जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १७/१०/२०२५ रोजी सकाळी १०:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं.ई-७१ ऑफ २०२५ दि. १५/१०/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. श्री संतोष गोराड<br>उपविभागीय अधिकारी<br>उपविभागीय कार्यालय **कन्नड** | : | अध्यक्ष |
| २. श्री. मनिष होळकर<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. श्री.अच्युतनांदवटे<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,<br>छत्रपती संभाजी नगर | : | समन्वयक |

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ६ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज जसे **अंजना नदी पात्रातील रेती घाट जसे टाकली**

होळकर

बु., जवखेड खु./जगखेड बु., सारोळा, शिवणा नदी पात्रातील रेती घाट जसे बोरसार बु./बोरसार खु. आणि शेवटा खु., पुर्णा नदी पात्रातील रेती घाट जसे दिगावखेडी जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १७/१०/२०२५ रोजी सकाळी १०:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले आहे.

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी सांगितले की सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार जाहीर सूचना ३० दिवस अगोदर दि. १६/०९/२०२५ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. सदर प्रकल्पाची माहिती पुस्तिका, कार्यकारी सारांशाची प्रत, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती इत्यादी दस्तावेज (इंग्रजी व मराठी मध्ये) जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना / आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आलेली होती. , त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

२. जिल्हा परिषद कार्यालय, अंबा अप्सरा समोर, छत्रपती संभाजीनगर.

३. जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर.

४. तहसिल कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

५. पंचायत समिती कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

६. ग्रामपंचायत कार्यालय, **टाकली बु./ (जवखेड खु./जगखेड बु.)/ सारोळा/ (बोरसार बु./बोरसार खु.)/ शेवटा खु. आणि दिगावखेडी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर**.

७. प्रादेशिक कार्यालय/उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ४/१ पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

जन सुनावणी बाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेमध्ये प्रकल्पासंबंधीत बाधित अथवा इतर व्यक्तींनी प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांशाच्या प्रति अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाबाबत आपले मत, विचार, सूचना , हरकती लेखी स्वरूपात सुनावणीच्या दिवसापर्यंत उप छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात याव्यात अथवा सुनावणीच्या दिवशी देण्यात याव्यात . सुनावणी दरम्यान आपले लेखी मत, विचार, सूचना , हरकती सादर केल्या जाऊ शकतात अथवा त्यांचे सादरीकरण केले जाऊ शकते याबाबत आवाहन करण्यात आले. त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे लोकांकडून **कन्नड** तालुक्यातील प्रस्तावित रेतीघाटांबाबत सुनावणीच्या दिवसापर्यंत कुठल्याही आक्षेप हरकती अथवा सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी ही सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचे मत व्यक्त करण्याचे ठिकाण असून पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती संमत करण्याबाबत निर्णय पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय येथे घेतला जाईल. त्यामुळे त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्प बाबतचे त्यांचे मत आक्षेप हरकती सूचना व्यक्त करण्याबाबतचे आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत सूचना आक्षेप यांचे व्हिडिओ शूटिंग करून त्याबाबतचे इतिवृत्त पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणी समितीच्या अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी श्री संतोष गोराड यांनी पर्यावरण विषयक जन सुनावणी सुरू करण्याचे व प्रकल्प प्रवर्तकास त्यांच्या प्रकल्पाचे पर्यावरण विषयक ठळक बाबी पर्यावरण विषयक केलेल्या उपायोजना इत्यादी बाबत सादरीकरण करतील असे सांगितले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार इन्वायरो टेक्नो कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यांच्या साजरीकरणात त्यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती उत्खनन करावयाचे खनिज रेतीघाट प्रस्तावित करणारी समिती व उत्खनन करण्यासाठी ठरवून दिलेला कालावधी इत्यादी बाबतची माहिती दिली. रेती उत्खननाची पद्धत वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा ध्वनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा वाहतूक व्यवस्थापन वृक्षारोपण योजना इत्यादी बाबतची इत्यंभूत माहिती देण्यात आली. सुनावणी दरम्यान त्यांनी प्रस्तावित रेती घाटाचे कार्यक्षेत्र, अंदाजीत उत्खनन होणारी रेती, उत्खननासाठी वापरली जाणारी यंत्रणा व पर्यावरण पूरक उपाय योजनांची माहिती दिली. रेती उत्खननाबाबत जिल्हा खनीकर्म अधिकारी जिल्हा पर्यावरण विषयक समितीस नियमितपणे अहवाल सादर करतील. जिल्हा खनिकर्म समिती माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली असून सदर समितीत उपविभागीय अधिकारी तहसीलदार कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग पोलीस आणि आरटीओ विभागाचा प्रतिनिधी यांचा समावेश असून जिल्हा खनिकर्म अधिकारी सदर समितीचे सदस्य सचिव आहेत. गौण खनिज उत्खनन प्रकल्पाबाबत पर्यावरण विभाग मंत्रालय यांचे परिपत्रक दिनांक ३ डिसेंबर २०१९ व परिपत्रक दिनांक ०४ मे २०२० अनुसार



होळकर

पर्यावरण विषयक सुनावणी घेण्यात येत आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचे सादरीकरण संपले असे जाहीर करून उपस्थित जनसमुदायास त्यांचे प्रश्न, शंका अथवा सूचना देऊ शकतात असे सांगितले.

अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी उपस्थित जनसमुदायास कन्नड तालुक्यातील रेती उत्खनन प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना , विचार, हरकती नोंदविण्यासाठी सर्वप्रथम आपले नाव सांगावे आणि त्यानंतर आपले प्रश्न मांडावेत असे सांगितले.

१. सारोळा गावचे सरपंच पती श्री जगन्नाथ यांनी सांगितले ते सारोळा गावांमध्ये घरकुलांचे काम सुरू असून त्यासाठी लागणाऱ्या रेती मिळण्यासाठी अडचणी आहेत. रेती उत्खनन केल्यानंतर घरकुल बांधकामासाठी शासनाकडून काही रेती मिळेल का आणि आपणास गरज भासल्यास ग्रामपंचायत कार्यालयाकडून रेती उत्खननानंतर रेतीच्या डेपोसाठी जागा उपलब्ध करून दिली जाऊ शकते असे त्यांनी सांगितले.

   पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की □ एकूण उत्खनन केलेल्या रेतीसाठ्यापैकी दहा टक्के साठा पंतप्रधान आवास योजना आणि घरकुल योजनेसाठी राखीव ठेवलेला असून आपण ऑनलाइन अर्ज केल्यानंतर आपणास रेती निशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल.□

२. श्री दिगंबर ससुंद्रे यांनी सांगितले की □ पूर्णा नदी पात्रात सद्यस्थितीत रेतीची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू असून तेथे रेतीचा साठा उपलब्ध आहे आम्ही सर्व गावकरी रेती उपसा करण्यास विरोध करणार नाही. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पूर्णा नदी पात्रात गट क्रमांक २,३,४,५,६ या ठिकाणी रेती उत्खनन प्रस्तावित केले आहे.श्री दिगंबर ससुंद्रे यांनी सांगितले की उपरोक्त उल्लेखित गट क्रमांक शेजारी पाणीपुरवठा विहीर असल्यामुळे त्याच्या पाणीपुरवठ्याला बाधा येऊ शकते. त्यामुळे किती अंतरावर रेतीचे उत्खनन केले जाईल.

   पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की □ विहिरीपासून साधारणतः २०० मीटर अंतर संरक्षित क्षेत्र असून त्या क्षेत्रामध्ये रेती उपसा केला जाणार नाही.□

   श्री दिगंबर ससुंद्रे यांनी सांगितले की □ पूर्णा नदी पात्रात पुलापासून खालच्या बाजूस रेतीसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून त्या ठिकाणाहून रेतीची तस्करी केली जात आहे. तिला नियंत्रित आणण्याची गरज व शासनाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे□ असे सांगितले.

   जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी □ सदरबाबत स्थळ पाहणीसाठी मंडळ अधिकारी तलाठी यांना पाठवून तहसीलदार कन्नड योग्य ती कार्यवाही करतील□ असे सांगितले. एकूण उत्खनन केलेल्या रेतीसाठ्यापैकी दहा टक्के साठा पंतप्रधान आवास योजना आणि घरकुल योजनेसाठी राखीव ठेवलेला असून आपण ऑनलाइन अर्ज केल्यानंतर आपणास रेती निशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल.

३. ग्रामपंचायत अधिकारी श्री अशोक काळे यांनी सांगितले की माझ्या सारोळा गावात २०२ घरकुले मंजूर असून शासनाने घरकुलाच्या बांधकामासाठी शंभर दिवसाची मुदत दिलेली आहे. घरकुलाच्या बांधकामासाठी रेती मिळण्यास अडचण येत असून शासनाने दिलेल्या १०० दिवसांपैकी ६० दिवस

पूर्ण झालेले असून उर्वरित ४० दिवसात घरकुलाचे बांधकाम रेतीअभावी करण्यामध्ये अडचणी येत आहेत त्यामुळे लिलाव प्रक्रिया व जन सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून घरकुल बांधकामासाठी रेती उपलब्ध करून देण्याबाबत मी विनंती करत आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी  एकूण उत्खनन केलेल्या रेतीसाठ्यापैकी दहा टक्के साठा पंतप्रधान आवास योजना आणि घरकुल योजनेसाठी राखीव ठेवलेला असून आपण ऑनलाइन अर्ज केल्यानंतर आपणास रेती निशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल.  असे सांगितले.

४. श्री दिगंबर ससुंद्रे यांनी सांगितले की  पूर्णा नदी पात्रात गट क्रमांक २,३,४,५,६ या ठिकाणी रेती उत्खनन प्रस्तावित केले आहे. परंतु त्याच्या शेजारी गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याची विहीर असल्याकारणाने पाणीसाठा प्रभावित होऊ शकतो त्यामुळे सदर ठिकाणचे उत्खनन इतरत्र करता येणार नाही का असा प्रश्न उपस्थित केला

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पूर्णा नदी पात्रात तालुका तांत्रिक समितीने सर्वे करून सुचवलेल्या सर्वे नंबरमध्ये उत्खनन केले जाईल. पिण्याच्या पाण्याच्या विहिरी सभोवतालचा २०० मीटर चा पट्टा संरक्षित केलेला असून त्या ठिकाणी उत्खनन केले जाणार नाही असे सांगितले

माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे प्रश्न संपले असतील असे गृहीत धरून जनसुनावणी संपन्न झाली असे मी जाहीर करते असे सांगितले. जन सुनावणी समन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानून झालेल्या जन सुनावणीचे इतिवृत्त व व्हिडिओ रेकॉर्डिंग पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय यांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगून जन सुनावणी संपली असे जाहीरकेले.

**(अच्युत नांदवटे)**
**समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

**(श्री. मनिष होळकर)**
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

**(श्री संतोष गोराड)**
**अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी**
**उपविभागीय कार्यालय कन्नड**

******************************************